# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stole property**

**Police Station** :- **Karanja**

**Date of Good Work done** :- **07/11/2022**

**Brief of the work done :-**

पोलीसांनी अवघ्या 48 तासांत केले मोबाईल चोरट्यास जेरबंद ; आरोपीकडून 26 हजारांचा मोबाईल जप्त.

# पोलिसांनी मोबाईल चोराला केले जेरबंद

## अवघ्या ४८ तासात आरोपीला अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...



**कारंजा** ▪ कारंजा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जयस्तंभ परिसरात असलेल्या कार्यालयातून अज्ञात चोरट्याने जिओ कंपनीचा मोबाईल चोरून पळ काढला. कारंजा शहर पोलिस ठाण्यात तक्रार मिळताच अवघ्या ४८ तासात आरोपीला अटक करून त्याच्याकडून २५ हजार ८०० रुपयांचा मोबाईल जप्त केल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कारंजा शहर पोलीस ठाण्यात लोकमान्य नगर कारंजा येथील धीरज शिवप्रभू पट्टेवार (२९) यांनी तोंडी फिर्याद दिली असून, कारंजा येथील जयस्तंभ चौकात तो जिओ कंपनीचे कार्यालय चालवितो.अज्ञात चोरट्याने कार्यालयातून जिओ कंपनीचा अंदाजे २५,८००/ रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला. या फिर्यादीवरून कारंजा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भादंवीच्या कलम ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवून अवघ्या ४८ तासात आरोपी सुखदेव निवृत्ती राऊत रा. वाल्हई ता. कारंजा जि.वाशिम याला अटक करून त्याच्याकडून २५,८००/- किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक गजानन धंदर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बी.सी. रेघीवाले, कर्मचारी उमेश विबेकर, सुरज, नितीन पाटील, गजानन शिंदे, अमित भगत यांनी केली. प्रकरणाचा तपास उमेशकुमार बिबेकर करीत आहेत. (ता.प्र.)